PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aaytya Gharat Gharoba
Year: 1991

Song: Premachi Hee Gadi
Lyricist:

प्रेमाची ही गाडी त्यात परी बसली
तिच्या गाली बघा माझी प्रीत हसली
प्रेमाची ही गाडी त्यात परी बसली
तिच्या गाली बघा माझी प्रीत हसली
ही प्रेमनगरी माझी प्रेमनगरी
ही प्रेमनगरी माझी प्रेमनगरी
तुझ्यावरी प्रीत कशी करील कुणी
भ्रमराची रीत अशी वरिल कुणी
ही प्रीत ना खरी
तुझी प्रीत ना खरी
म्हणे प्रेमनगरी खोटी प्रेमनगरी

तुझी मोरणीची चाल
माझ्या काळजाचे हाल
तुझे बोल हळूवार
जसे चाळ देती ताल
येई प्रेमाचे हे गाणं माझ्या ओठावरी
तू रे मोठा चालबाज
येशी करूनीया चाल
जसा वाटे प्रेमवीर
आला बांधायाला ताज
कसा ठेवू भरवसा मी रे तुझ्यावरी
तुझी प्रेमनगरी खोटी प्रेमनगरी
आला तुला राग
तुझ्या मनी अनुराग
हळूवार प्रेमाला गं
येते अशी जाग

नको होऊ बावरी
माझी प्रेमनगरी खरी प्रेमनगरी
तुझी प्रेमनगरी खोटी प्रेमनगरी
खोटी प्रेमनगरी

सुन माहिए
आजा कोल माहिए
बोल बोल सोणिए
चांद पुनवेचा बहरत आला
वारा मदनाचा लहरत आला
पान पानात बिलगत गेला
चांदवा प्रीतीचा मला देना
चांदवा प्रीतीचा मला देना
तुझी जाई जुईची गं काया
रातराणी ही आली बघाया
फूल उमले कसे गंध द्याया
हा दुरावा दूर कर येना
हा दुरावा दूर कर येना
मिळता हा तुजसम सजण गुणी
प्रणयाचे मोल कधी करील कुणी
अनमोल नगरी तुझी प्रेमनगरी
अनमोल नगरी तुझी प्रेमनगरी
तुझी प्रेमनगरी
प्रेमाची ही गाडी त्यात परी बसली
ओ तिच्या गाली सख्या तुझी प्रीत हसली
ही प्रेमनगरी अनमोल नगरी
तुझी प्रेमनगरी माझी प्रेमनगरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*